Shri Vile Parle Kelavani Mandal's

# SHRI BHAGUBHAI MAFATLAL POLYTECHNIC AND COLLEGE OF ENGINEERING

(DTE CODE : 3025)

एन -५/ 1482 /२०२६-२७ दि. १६/०३/२०२६

## परिपत्रक

**शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत (कॅस) लाभ मंजूर करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने माहिती भरणे व प्रमाणपत्रे अपलोड करणे याबाबत...**

मा. संचालक तंत्रशिक्षण कार्यालय महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक ४-४अ/आस्था/कॅस/२०२६/७५, दि. २८/०२/२०२६ व ४-४अ/आस्था/कॅस/२०२६/९४, दि. १२/०३/२०२६ .

उपरोक्त परिपत्रकांच्या अनुषंगाने संस्थेतील पात्र कार्यरत व सेवानिवृत्त अधिव्याख्याताना (अनुदानित विभाग) कळविण्यात येते की, संबंधित अधिव्याख्यात्यांनी कॅस लाभ मिळण्याकरीता ऑनलाईन पद्धतीने DTE EMIS पोर्टलवर खालील लिंक चा वापर करुन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

http://dtemis@dtemaharashtra.gov.in

सदर अर्जाची प्राथमिक पडताळणी संस्थास्तरावर करण्यात येणार असून संबंधितांनी आपला अर्ज व संबंधित कागदपत्रे पडताळणीसाठी तयार ठेवावी जेणेकरुन सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या कडे विहीत मुदतीत ऑनलाईन पद्धतीने पाठविणे शक्य होईल.

अर्जास विलंब झाल्यास संस्था जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

SHRI BHAGUBHAI MAFATLAL POLYTECHNIC & COLLEGE OF ENGINEERING ★ MUMBAI 400 056.

प्राचार्य

**प्राचार्य**

**श्री भगुभाई मफतलाल तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालय**

विलेपार्ले (प.), मुंबई-४०००५६.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४२४/४३४
email–desk4a@dtemaharashtra.gov.in,website: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक /कालमर्यादेत

क्रमांक : ४-४अ/आस्था/कॅस/२०२६/७५ दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२६

**विषय :** तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांना पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत (CAS) लाभ मंजूर करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने माहिती संकलित करण्याबाबत....

**संदर्भ :**
१. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. आरपीएस २९९८/७७/तांशि-६, दि.१८.१२.१९९९.
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. एटिव्ही २०००/७४/तांशि-५, दि.१३.३.२००२
३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. आरपीएस/१२२०/१/तांशि-५, दि.२७.२.२००३
४. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. एटीयु २०००/७४/२०००/तांशि-५ दि.८.११.२००४
५. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. एटीयु २०००/७४/२०००/तांशि-६, दि. ६.०२.२००६
६. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एसपीसी- २०१०/(३४/१०)/तांशि-२, दि. २०.०८.२०१०
७. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एससीटी ६५१०/(१६/१०)/तांशि १, दि. २९.१०.२०१२
८. तंत्र शिक्षण संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ४अ/आस्था/कॅस/२०१२/ २६५८, दि. ०४.०४.२०१२
९. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.कॅस २०१३/(३२/१३)/तांशि-२, दि.१७.१०.२०१५
१०. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.कॅस २०१३/(३२/१३)/तांशि-२, दि.१३.१०.२०१६
११. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.सावेआ-१११९/प्र.क्र.४४/१९/तांशि-२, दि.११.०९.२०१९ (पदवी व पदविका)

१२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.एमआयएससी/१११९/२८/१६/टिई-२, दि.०३.०६.२०२२
१३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र. ४-४अ/आस्था/कॅस/६ वावेआ/२०२२/४२७, दि. ०७.०७.२०२२
१४. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे दि. ०७.०२.२०२५ रोजीचे आदेश
१५. शासन शुध्दीपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.१०७२००१/HTED-११०३३/१/२०२५-MHT-TE- २, दि.१८.०२.२०२६
१६. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.वेश्रेणी-२०२५/प्र.क्र.६५/ई-१०७२००१/तांशि-२ , दि.१८.०२.२०२६. (दोन स्वतंत्र शासन निर्णय)

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत लाभ मंजूर करण्याबाबत संदर्भाधीन क्र. १२ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. त्यानुसार शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांमधील कॅस योजनेंअतर्गत पात्र ठरणाऱ्या अध्यापकांचे प्रस्ताव संदर्भ क्रमांक १३ च्या परिपत्रकान्वये संचालनालयाने मागविले होते. संदर्भ क्रमांक १२ चा शासन निर्णय व संदर्भ क्रमांक १३ चे संचालनालयाचे परिपत्रकाच्या विरुद्ध पदविका व पदवी संस्थांतील अध्यापकांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे मूळ अर्ज क्र. ८१७/२०२२ व १०५०/२०२२ दाखल केले होते. या न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिनांक ०७/०२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्रमांक १५ व १६ अन्वये अनुक्रमे शासन शुद्धीपत्रक व शासन निर्णय निर्गमित केलेले असल्याने, Career Advancement Scheme (CAS) च्या अनुषंगाने पात्र अध्यापकांना लाभ मंजूर करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशास अनुसरून संदर्भ क्रमांक १५ शासन शुध्दीपत्रकान्वये Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत लाभासाठी वेतनआयोगनिहाय तरतुदी / अटी / निकषांसाठी खालीलप्रमाणे कालावधी निर्धारित करण्यात आला आहे.

| आयोग निहाय अटी व शर्ती | अंमलबजावणीचा कालावधी |
|---|---|
| ५ वा वेतन आयोगातील तरतुदी / अटी / निकष | दि. ०१ जानेवारी, १९९६ ते दि. १० सप्टेंबर, २०१९ |
| ६ वा वेतन आयोगातील तरतुदी / अटी / निकष | दि. ११ सप्टेंबर, २०१९ ते दि. ३१ डिसेंबर, २०२४ |
| ७ वा वेतन आयोगातील तरतुदी / अटी / निकष | दि. १ जानेवारी, २०२५ पासून पुढे |

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तसेच अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतने तसेच तत्सम संस्था आणि स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांतील अध्यापकांना Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत अनुज्ञेय लाभ मंजूर करण्याचे सर्व अधिकार संदर्भ क्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी कॅस योजनेंतर्गत सहाव्या वेतन आयोगाच्या तरतुदींविषयी वेळोवेळी निर्गमित केलेल्या स्पष्टीकरणांच्या अनुषंगाने शासन निर्णय संदर्भ क्रमांक १२ अन्वये निर्गमित

करण्यात आला आहे. तथापि, सदर शासन निर्णयाविरुद्ध मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई व नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या मूळ अर्जांवर मा. न्यायाधिकरणाने दिलेल्या स्थगिती आदेशांमुळे कॅस योजनेंतर्गत अनुज्ञेय लाभ मंजुरीची कार्यवाही प्रलंबित राहिलेली आहे. तसेच कॅस योजनेच्या लाभाबाबत वेतनआयोगनिहाय तरतुदींच्या सुधारित कालावधीनुसार यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या लाभाच्या मंजुरीचा दिनांक सुधारित होण्याची शक्यता आहे. परिणामस्वरुपी कॅस योजनेंतर्गत लाभासाठी प्रलंबित लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. संदर्भ क्रमांक १ ते ६, ९ ते १२, १५ व १६ तसेच यामध्ये नमूद केलेल्या **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,** नवी दिल्ली यांच्या अधिसूचना / मार्गदर्शक सूचना व इतर संबंधित संदर्भातील तरतुदीनुसार पात्र ठरणाऱ्या अध्यापकांना *Career Advancement Scheme (CAS)* अंतर्गत लाभ मंजूर करणे आवश्यक आहे. कॅस योजनेंतर्गत लाभ मंजुरीसाठी अध्यापकनिहाय प्रस्ताव हार्ड कॉपीच्या आधारे कार्यवाही केल्यास मोठ्या प्रमाणात कागदपत्रे संकलित होण्याची शक्यता आहे. तसेच, अध्यापकनिहाय प्रस्तावांची हार्ड कॉपी संस्था स्तर, विभागीय कार्यालय स्तर व संचालनालय स्तरावर प्रत्येक संच स्वतंत्रपणे जतन करावी लागणार आहे. याशिवाय, कागदपत्रांचे जतन व हाताळणी करताना अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होऊन अधिकचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त नमूद वस्तूस्थिती लक्षात घेता, कॅस योजनेंतर्गत लाभ मंजूर करण्याची कार्यवाही सुलभ, पारदर्शक तसेच विहित कालमर्यादेत व तातडीने पूर्ण करण्याच्या उद्देशाने आवश्यक माहिती व दस्तावेजांचे संकलन करण्याकरिता संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत आहे. सदर संगणकीय प्रणालीची लिंक https://emis.dtemaharashtra.gov.in अशी असून, ऑनलाईन प्रणालीद्वारे माहिती भरण्यासाठी सदर लिंक दिनांक ०६.०३.२०२६ पासून कार्यान्वित करण्यात येत आहे. या ऑनलाईन प्रणालीद्वारे संबंधित अध्यापकांकडून ऑनलाईन पद्धतीने माहिती व आवश्यक दस्तावेज संकलित करण्यात येणार आहेत. **सबब, दि. ३१.०३.२०२६ पर्यंत करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) योजनेच्या लाभासाठी पात्र होणाऱ्या सर्व अध्यापकांनी ऑनलाईन पध्दतीनेच माहिती सादर करणे अनिवार्य आहे.**

संगणक प्रणालीद्वारे लाभार्थी अध्यापक, संबंधित संस्थेचे प्राचार्य, सहसंचालक व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय स्तरावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबतची कार्यपद्धती व कालमर्यादानिहाय टप्पे खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत. **सदर संगणक प्रणालीच्या वापराबाबत User Manual सदर लिंकवर उपलब्ध आहे.**

**१) पदवी व पदविका संस्थेतील संबंधित अध्यापक (दि. ६ मार्च, २०२६ ते ३० मार्च, २०२६) :**

संदर्भ क्रमांक १ ते ६, ९ ते १२, १४ व १५ तसेच यामध्ये नमूद केलेल्या **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,** नवी दिल्ली यांच्या अधिसूचना / मार्गदर्शक सूचना व इतर संबंधित संदर्भातील तरतुदी पूर्ण करणाऱ्या पात्र अध्यापकांना Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत लाभ मिळण्यासाठी दिनांक **०६ मार्च २०२६ ते दिनांक ३० मार्च २०२६** या कालावधीत https://emis.dtemaharashtra.gov.in या लिंकवर लॉग-इन करून त्यांची माहिती तसेच संबंधित प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या मूळ प्रतींच्या प्रतिमा (स्कॅन प्रती) अपलोड कराव्यात. संगणकीय प्रणालीवरील User Manual मधील सूचनांनुसार व विहित टप्प्यांप्रमाणे लॉग-इन करून माहिती व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील. संगणकीय प्रणालीवर माहिती भरताना उपलब्ध सेवाभिलेखाच्या आधारेच माहिती भरण्यात यावी. संबंधित अध्यापकांनी ऑनलाईन प्रणालीमध्ये सर्व आवश्यक माहिती भरून संबंधित कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, माहिती व कागदपत्रे सत्य व अचूक असल्याबाबतच्या घोषणापत्रातील "मान्य/स्वीकृत (✓)" या पर्यायाची केलेली निवड ही संबंधित अध्यापक यांचे हमीपत्र (Undertaking) समजण्यात येईल. सदर घोषणेनंतर माहिती अथवा कागदपत्रांमध्ये कोणतीही त्रुटी किंवा चुकीची नोंद आढळल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अध्यापक यांच्यावर राहील व त्यांचेविरुद्ध शासन नियमांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

येथे असेही नमूद करण्यात येते की, जे अध्यापक सेवानिवृत्त अथवा स्वेच्छानिवृत्त झालेले आहेत, त्यांनी ऑनलाईन प्रणालीवर देण्यात आलेल्या सूचनेनुसार युजर आयडी (User ID) निर्माण करण्यासाठी आवश्यक ती माहिती भरावी. या भरलेल्या माहितीची अधिकृतता संबंधित अध्यापक ज्या संस्थेतून सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त झाले आहेत त्या संस्थेचे प्राचार्य यांनी "मान्य (Approved)" केल्यानंतरच संबंधित अध्यापकांना ऑनलाईन पद्धतीने पुढील माहिती भरण्याची परवानगी देण्यात येईल. त्यानुसार, संबंधित अध्यापकांनी युजर मॅन्युअलमध्ये नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती व प्रमाणपत्रे ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी.

**<u>२) संबंधित संस्थेचे प्राचार्य</u> (दि. २० मार्च, २०२६ ते दि. ९ एप्रिल, २०२६) :**

संगणक प्रणालीमध्ये अध्यापकांनी नोंदविलेली व प्राचार्यांनी सखोल तपासणी करून प्रमाणित केलेली माहिती ही पुढील सर्व प्रशासकीय कार्यवाहीसाठी आधारभूत मानण्यात येणार आहे. त्यामुळे संस्थास्तरावर पार पाडण्यात येणारी प्रथम टप्प्यातील कार्यवाही ही केवळ औपचारिक नसून संपूर्ण प्रक्रियेच्या गुणवत्ता, अचूकता व परिणामकारकतेचा मूलाधार ठरणारी आहे. या पार्श्वभूमीवर कॅस योजनेचे लाभ प्राप्त माहितीच्या आधारे मंजूर करण्यासाठी अध्यापकांची माहिती व प्रमाणपत्रांची प्राथमिक छाननी अचुकतेने होणे आवश्यक आहे. सबब, संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी दिनांक **२० मार्च, २०२६ ते ९ एप्रिल, २०२६** या कालावधीत संगणकीय प्रणालीवर भरलेली माहिती व अपलोड केलेली कागदपत्रांची पडताळणी / छाननी / शहानिशा करून सत्यसत्यता तपासण्याची कार्यवाही सुध्दा कालमर्यादेत करावी.

संदर्भ क्रमांक १ ते ६, ९ ते १२, १५ व १६ तसेच यामध्ये नमूद केलेल्या **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद**, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना / मार्गदर्शक सूचनांनुसार प्राचार्यांनी त्यांचे अभिप्राय तसेच कॅस लाभ मंजुरीचा प्रस्तावित दिनांक संगणकीय प्रणालीवर नोंदवावा. सदर कार्यवाही दिनांक **९ एप्रिल, २०२६** पर्यंत पूर्ण करण्यात यावी. त्यानंतर संगणकीय प्रणालीवरील विहित विवरणपत्रांची प्रिंटआऊट घेऊन त्यावर स्वाक्षरी करून संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यात यावीत. तसेच अपलोड केलेल्या विवरणपत्रांचा मुळ संच संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांच्याकडे दिनांक **१० एप्रिल, २०२६** रोजी सादर करावी. तसेच प्राचार्यांनी ऑनलाईन प्रणालीमध्ये भरलेली माहिती तसेच अपलोड केलेली कागदपत्रे यांची पडताळणी / तपासणी केली असून ती सत्य व अचूक असल्याबाबत घोषणापत्रातील "मान्य/स्वीकृत (✓)" या पर्यायाची केलेली निवड ही संबंधित प्राचार्य यांचे हमीपत्र (Undertaking) समजण्यात येईल.

विद्यमान संस्थेतून इतर संस्थेत उसनवारी तत्वावर कार्यरत असलेले, उच्च शिक्षणासाठी प्रतिनियुक्त असलेले, सेवानिवृत्त अथवा स्वेच्छानिवृत्त झालेल्या अध्यापकांना याबाबत माहिती देण्यात यावी व त्यांना कॅस योजनेअंतर्गत लाभ देय ठरत असल्यास, त्यांना कागदपत्रांच्या तपासणीसाठी बोलवून त्यांच्या कागदपत्रांची सुध्दा पडताळणी करावी. तसेच प्राचार्यांनी विभागीय कार्यालयांना सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने विभागीय कार्यालय स्तरावरील छाननी समितीस आवश्यक ती माहिती व संबंधित कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देण्यात यावीत. तसेच प्राचार्यांनी त्यांच्या स्तरावरुन झालेल्या पडताळणी / तपासणीच्या आधारे पुढील कार्यवाही होणार असल्याने त्रुटीयुक्त माहितीमुळे चूकीची कार्यवाही झाल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास त्यासाठी संबंधित प्राचार्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३) **सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये** (दि. १३ एप्रिल, २०२६ ते ३० एप्रिल, २०२६) :

संबंधित विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय / अशासकीय अनुदानित, स्वायत्त व अस्वायत्त पदवी व पदविका संस्थांच्या प्राचार्यांनी सादर केलेले अहवाल तसेच संगणकीय प्रणालीवरील माहिती कॅस योजनेच्या नियमानुसार पडताळणी करून घ्यावी. पडताळणीदरम्यान काही त्रुटी आढळून आल्यास, संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना तात्काळ सूचित करून त्या दुरुस्त करुन घ्याव्यात.

संगणक प्रणालीवर प्राप्त माहितीची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक ८ च्या कार्यालयीन आदेशानुसार छाननी समिती गठीत करावी. छाननी समितीसमोर कागदपत्रांचे सादरीकरण आवश्यक असल्यास, संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना बैठकीच्या दिवशी उपस्थित राहण्यासाठी बोलावण्यात यावे. छाननी समितीपुढे विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कॅस लाभाची प्रकरणे सादर करून त्यावर समितीचे अभिप्राय / शिफारशी, प्रादेशिक विभागीय सहसंचालक नात्याने त्यांच्या शिफारशी संगणकीय प्रणालीवर नोंदवाव्यात. उपरोक्त सर्व कार्यवाही दिनांक **१३ एप्रिल, २०२६ ते ३० एप्रिल २०२६** या कालावधीत पूर्ण करण्यात यावी. त्यानंतर संगणकीय प्रणालीवरील विहित विवरणपत्रांची प्रिंट आऊट घेऊन ते स्वाक्षरी करून संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यात यावीत. तसेच अपलोड केलेल्या विवरणपत्रांचा मुळ संच संचालनालय स्तरावरील निवड समितीच्या बैठकीसमोर सादर करण्यात यावा. तसेच ऑनलाईन प्रणालीवरील माहिती व प्रमाणपत्रांची तपासणी / पडताळणी केली असून ती सत्य व अचूक असल्याबाबत घोषणापत्रातील "मान्य/स्वीकृत (✓)" या पर्यायाची केलेली निवड ही संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांचे हमीपत्र (Undertaking) समजण्यात येईल व सदर कार्यवाहीच्या अचुकतेकरिता ते स्वत: जबाबदार असतील.

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या स्तरावरून तात्काळ त्यांच्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील स्वायत्त व अस्वायत्त शासकीय तसेच अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांना अग्रेषित करावे. तसेच, परिपत्रकात नमूद केलेल्या कार्यवाहीची संस्थास्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू आहे किंवा नाही, याबाबत नियमितपणे आढावा घ्यावा. कार्यवाहीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण त्यांच्या स्तरावर तात्काळ करावे व आवश्यकतेनुसार त्याबाबत संचालनालयास अवगत करावे.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत, माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ छ. संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
त्यांना कळविण्यात देण्यात येते की, मंडळ तसेच मंडळाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयात कार्यरत शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांच्या संदर्भात परिपत्रकातील टप्पा २ (संबंधित संस्थेचे प्राचार्य) मधील सूचनांची अंमलबजावणी करून कार्यवाहीचा अहवाल संबंधित विभागीय कार्यालयाकडे विहित कालमर्यादेत सादर करावा.

४) कार्यासन क्रमांक ३, ४, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई

५) कार्यासन क्रमांक ४अ, निवड नस्तीस

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४२४/४३४
ई-मेल-desk4a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक : ४-४अ/आस्था/कॅस/२०२६/ ९४ दिनांक : १२ मार्च, २०२६

विषय : करियर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत (CAS) लाभ मंजूर करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती भरणे व प्रमाणपत्रे अपलोड करणे इ. कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना...

संदर्भ : या संचालनालयाचे परिपत्रक क्र. ४-४अ/आस्था/कॅस/२०२६/७५, दि. २८.०२.२०२६

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदवी तसेच पदविका संस्थांमधील अध्यापकांना पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतनआयोगाच्या शिफारशींनुसार करियर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत (CAS) लाभ मंजूर करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती संकलित करण्याबाबतच्या सूचना उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. तसेच संबंधित अध्यापकांना CAS योजनेंतर्गत लाभ मंजूर करण्याची कार्यवाही सुलभ, पारदर्शक तसेच विहीत कालमर्यादेत तातडीने पूर्ण करण्याच्या उद्देश्याने आवश्यक ती माहिती व दस्तावेजांचे संकलन करण्याकरिता संगणकीय प्रणाली विकसित करण्यांत येऊन, दिनांक ०६-०३-२०२६ पासून सदरची प्रणाली (User Manual व FAQ सहीत) कार्यान्वित करण्यांत आलेली आहे.

तथापि, सदरच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये (Online Module) माहिती भरताना संबंधित अध्यापकांकडून CAS योजनेअंतर्गत अनुज्ञेय लाभासाठी निश्चित केलेल्या अटी, जसे प्रशिक्षण (Training), पूर्व सेवा (Past Service), नियुक्ती स्वरुप, शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी / स्तर / लेव्हल. इ. विविध मुद्यांबाबत दूरध्वनीवरुन वारंवार विचारणा होत आहे. त्याअनुषंगाने संबंधित अध्यापकांना माहिती भरण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा विचार करुन, संबंधित अध्यापकांना व संस्थाप्रमुखांना खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यांत येत आहेत.

**अ) पदवी / पदविका संस्थांमधील संबंधित अध्यापक :**

i. CAS पोर्टलवरील माहिती भरण्यापूर्वी सर्व अध्यापकांनी EMIS वरील माहिती तपासावी. सदरच्या माहितीमध्ये काही त्रुटी असल्यास अथवा माहिती अपूर्ण भरलेली असल्यास त्यांनी याबाबत संस्था प्रमुखांशी संपर्क साधावा.

ii. संबंधित अध्यापकांनी EMIS पोर्टलवरील माहितीची खातरजमा करुन CAS पोर्टलवर माहिती भरावी.

iii. CAS पोर्टलवरील माहिती भरण्यासाठी शासकीय संस्थेतील अध्यापकांनी https://dtemis@dtemaharashtra.gov.in लिंक वापरावी. अशासकीय अनुदानित संस्थेतील अध्यापक व सेवानिवृत्त / स्वेच्छासेवानिवृत्त अध्यापकाकरीता पोर्टलच्या मुख्य पृष्ठावर लिंक दिलेली असून त्यानुसार त्यांनी माहिती भरण्याची कार्यवाही करावी.

iv. संबंधित अध्यापकांनी सदरची माहिती भरताना CAS योजनेच्या लाभासाठी निर्धारीत केलेल्या अटी व शर्तीबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके/ स्पष्टीकरणे, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना / परिपत्रके / पब्लिक नोटिस इ. अभ्यासून माहिती भरावी. अवांतर व गैरलागू माहिती भरण्यात येऊ नये.

v. "Appointment Information" या टॅबअंतर्गत माहिती भरताना पात्र अध्यापकांनी त्यांचा नियुक्तीचा प्रकार निवडावा. तसेच त्यांचे नियुक्तीच्या वेळचे पदनाम निवडून संबंधित शासन आदेशाचा क्रमांक व दिनांक नमूद करुन नियुक्ती आदेश Upload करावेत. त्याअनुषंगाने नियुक्तीच्या वेळी त्यांना लागू असलेली वेतनसंरचना निवडावी.

vi. ज्या अध्यापकांची ६ व्या वेतन आयोगामध्ये नियुक्ती झाली असेल त्यांना, नियुक्तीच्या वेळी रु. ५०००/- इतका ग्रेड पे असला तरी, तद्नंतर सदरचा ग्रेड पे ५४००/- असा सुधारित झाल्यामुळे त्यांनी ५४००/- हाच ग्रेड पे सिलेक्ट करावा.

vii. संबंधित अध्यापकांनी त्यांच्या परिविक्षा कालावधीची माहिती भरताना परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचा दिनांक तसेच आदेश क्रमांक नमूद करुन त्यांचे आदेश Upload करावेत. (कंत्राटी/हंगामी व समावेशन झालेल्या अध्यापकांच्या बाबतीत परिविक्षा कालावधी लागू नाही)

viii. "Details of Entry Pay/Senior Scale/Selection Grade" या टॅबअंतर्गत माहिती भरताना सर्व अध्यापकांनी त्यांच्या नियुक्तीच्या वेळच्या वेतनसंरचनेबाबतची माहिती भरणे अनिवार्य आहे. ज्या अध्यापकांना शासन / तंत्र शिक्षण संचालनालय / समुचित प्राधिकरण यांचेकडून पूर्वी CAS अंतर्गत प्रत्यक्ष लाभ मंजूर केले असतील त्यांनीच याबाबतची माहिती भरणे अपेक्षित आहे. **येथे संभाव्य लाभाचा दिनांक नमूद करणे अपेक्षित नाही.** त्यामुळे जे अध्यापक अशा प्रकारचा अनुज्ञेय होणाऱ्या लाभाचा दिनांक नमूद करतील त्यांना यापूर्वीच सदरचे लाभ मंजूर झाले आहे, असे गृहित धरण्यात येईल.

ix. "Qualification" या टॅबअंतर्गत माहिती भरताना संबंधितांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेची निवड करुन त्यांची मार्कशीट तसेच प्रमाणपत्राची प्रत अपलोड करावी.

x. "Additional Qualification" या टॅबअंतर्गत माहिती भरताना त्यांनी नियुक्तीनंतर धारण केलेल्या अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेबाबतची (उदा. एम.ई./एम.फील/पी.एचडी इ.) माहिती भरावयाची असून त्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालय / नियुक्ती प्राधिकारी यांचे प्रवेश घेण्यासाठीची `ना-हरकत प्रमाणपत्र' अपलोड करणे अनिवार्य आहे. मात्र तंत्र शिक्षण संचालनालय / नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे प्रवेश घेण्यास पुर्वमान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला, तथापि संचालनालय / नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावरील `ना-हरकत प्रमाणपत्र' निर्गमित झाले नसल्यास संबंधित अध्यापकांनी सदरची माहिती भरताना त्यांनी सदरच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतेवेळी विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत अपलोड करावी. मात्र सदर प्रस्तावाचा दिनांक हा एम.ई /एम.टेक / एम.फील.. / पी. एचडी इ. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या दिनांकापुर्वीचा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी प्राप्त केलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबतची मार्कशीट व प्रमाणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.

xi. अध्यापकांच्या नियमित नियुक्तीपुर्वीच्या पूर्व सेवा जोडून CAS अंतर्गत लाभ मिळण्याविषयी पूर्व सेवेबाबत दि. २७-२-२००३, दि. ०६-०२-२००६ चे शासन निर्णय व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची दि. ०८-११-२०१२ ची अधिसूचना यांचे सखोल वाचन करुन त्यानुसार अनुज्ञेय पुर्वसेवेसाठी दावा करावा. सदर दावा EMIS ऐवजी CAS प्रणालीमध्ये नोंदवावा.

xii. "Experience" (पूर्व सेवा) या टॅबअंतर्गत माहिती भरताना संबंधितांनी त्यांना असलेला अनुभव (Teaching/Industrial/Research) यापैकी एकाची निवड करुन, संस्थेचा प्रकार (Govt./Aided/Private etc.) यापैकी एक निवडावा. तसेच त्यांच्या अनुभवाचा कालावधी नमूद करुन त्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र अपलोड करावे. (संबंधितांनी त्यांच्या अनुभव प्रमाणपत्रावर जो कालावधी नमूद असेल तोच कालावधी नमूद करणे अनिवार्य आहे.)

xiii. उपरोक्त सर्व माहिती भरताना संबंधित अध्यापकांनी मूळ कागदपत्रांची स्कॅन प्रतिमा अपलोड करणे अनिवार्य आहे. साक्षांकित (Attested) केलेली कागदपत्रे अपलोड करणे अपेक्षित नाही.

xiv. संबंधित अध्यापकानी ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती अचूक भरण्याची दक्षता घ्यावी. दिशाभूल करणारी / अर्धवट माहिती भरल्यास संबंधितांच्या प्रकरणावर छाननी / निवड समितीव्दारे नकारात्मक निर्णय होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. असे झाल्यास यासाठी सर्वस्वी संबंधित अध्यापक जबाबदार रहातील.

xv. **उपरोक्त प्रमाणे माहिती भरुन आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक असल्याने सर्व अध्यापकांनी (माहिती भरत असलेले तसेच यापूर्वी माहिती सबमिट केलेले) भरलेल्या माहितीची पुन:श्च पडताळणी करुन अर्ज निश्चित करावे.**

xvi. संबंधित अध्यापकांना सदरच्या पोर्टलवर माहिती भरण्यासाठी काही तांत्रिक समस्या/अडचणी उद्भवल्यास त्यांनी ०२२-६८५९७४६९ / ४६६ या क्रमांकावर श्री. सुधीर उपरवट / श्री. नरेंद्र पाटील, प्रणाली विश्लेषक यांचेशी संपर्क साधावा तसेच dtemis@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर आपल्या समस्येबाबत कळवावे.

**ब) संबंधित संस्था प्रमुख :**

i. "पदवी / पदविका संस्थांमधील संबंधित अध्यापकांसाठी" या शिर्षाखाली नमूद उपरोक्त मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करून माहिती भरण्यास संबंधित अध्यापकांना आपले स्तरावरून सूचित करण्यात यावे.

ii. EMIS प्रणालीवरील माहिती सुधारित करण्यासाठी जे अध्यापक विनंती करतील, त्याबाबत संबंधित अध्यापकांच्या सेवाभिलेख / सेवापुस्तकावरुन खात्री करावी. जर माहिती त्रुटीयुक्त व अपूर्ण असल्याची संस्था प्रमुखांची खात्री झाल्यानंतर त्यांनी संचालनालयास ईमेल द्वारे विनंती केल्यास EMIS प्रणालीवरील माहिती सुधारित करण्यासाठी Unlock करण्यात येईल. तद्नंतर संस्था प्रमुखांनी संबंधित अध्यापकांची माहिती सुधारित करुन Confirm / Submit करावी.

iii. संस्था प्रमुखांनी अध्यापकांच्या विनंती अर्जात केलेल्या मागणीनुसार कॅस योजनेबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना / परिपत्रके / पब्लिक नोटीस इ. मध्ये नमूद केलेल्या अटी / शर्ती व स्पष्टीकरणे अभ्यासून अध्यापकनिहाय प्रत्येक लाभाच्या अनुषंगाने स्वतंत्र अभिप्राय नमूद करण्यांत यावा. तसेच सदरच्या प्रणालीमध्ये निर्धारीत केलेल्या जागेत संबंधित अध्यापकांच्या पात्र/अपात्रतेबाबत स्पष्ट शिफारस नोंदवावी. पात्रतेबाबत शिफारस नोंदवतांना अटी व शर्तीनुसार लाभाचा प्रस्तावित दिनांक नोंदविणे अनिवार्य राहील.

iv. कॅस लाभाच्या अनुषंगाने प्राथमिक स्तरावरील पडताळणी / तपासणी अत्यंत महत्वाची असून या स्तरावर केलेल्या तपासणीच्या आधारे पुढील कार्यवाहीची गुणवत्ता ठरणार आहे. सबब, संस्था प्रमुख स्तरावरील कार्यवाही अचूक होण्याकरिता, संस्था प्रमुखांनी अत्यंत जबाबदारीने व दक्षतेने पडताळणीची कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. अन्यथा त्यांनी पडताळणी केलेल्या माहितीच्या आधारे कॅस योजनेच्या लाभाची चुकीची अंमलबजावणी झाल्यास संबंधित संस्था प्रमुखांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

**क) संबंधित सहसंचालक :**

i. प्रादेशिक कार्यालय प्रमूख या नात्याने सहसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील त्यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेतील संस्था प्रमुखांना त्यांचे स्तरावरुन वरील प्रमाणे सूचना देऊन कार्यवाहीचा आढावा घ्यावा.

ii. संबंधित सहसंचालकांनी सदरच्या पोर्टलमध्ये माहिती भरण्याच्या अनुषंगाने प्राचार्य तथा संबधित अध्यापक यांना काही अडचणी आल्यास त्याबाबत आपल्या स्तरावरुन मार्गदर्शन करावे. याबाबत आवश्यकता असल्यास VC द्वारे सर्व प्राचार्यांचे एकत्रित समुपदेशन करावे.

iii. CAS लाभासाठीच्या निकषाबाबत प्राचार्य तथा संबंधित घटकांकडून काही तक्रारी / निवेदने असल्यास त्यावर स्पष्ट अभिप्राय नमूद करून संचालनालयास सादर करावेत.

iv. प्राचार्यांनी पडताळणी केलेली माहिती विद्यमान शासन निर्णय / शासन पत्र / परिपत्रके व शिखर परिषद यांच्या अधिसूचना / स्पष्टीकरणे इ. अभ्यासून सहसंचालक स्तरावर पडताळणी केल्यानंतर छाननी समितीपुढे प्रकरणे ठेवण्यात यावीत.

v. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या दि. ०४.०४.२०१२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये छाननी समितीची संरचना विहित केलेली आहे. छाननी समितीच्या शिफारशीं आधारभूत धरुन निवड समितीमार्फत निर्णय घेण्यांत येणार आहे. यास्तव छाननी समितीच्या शिफारशी ह्या अध्यापकांना लाभ मजूर करण्याच्या दृष्टीने महत्वपुर्ण आहेत. सबब, छाननी समितीचे अध्यक्ष या नात्याने विभागीय सहसंचालक व समिती सदस्यांनी कॅस योजनेतील नियमानुसार त्यांच्या शिफारशी कराव्यात.

vi. छाननी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रादेशिक कार्यालय प्रमूख नात्याने सहसंचालकांनी पात्र (दिनांकासह) / अपात्रतेबाबत स्पष्ट अभिप्राय नमूद करावेत.

संस्था प्रमुख/सहसंचालक यांनी तपासणी केलेल्या माहितीच्या आधारे छाननी समितीची शिफारस व या शिफारशीच्या आधारे निवड समितीव्दारे संबंधितांना CAS अंतर्गत लाभ मंजूरीची शिफारस करण्यांत येणार आहेत. यास्तव माहितीमध्ये भविष्यात काही त्रुटी /चुका /तफावत आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अध्यापक / संस्था प्रमुख / सहसंचालकांची राहील, याची नोंद घेण्यांत यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर
२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीरीता.
त्यांना कळविण्यांत येत की, तंत्र शिक्षण मंडळ तसेच मंडळाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयात कार्यरत शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांच्या संदर्भात कार्यवाहीसाठी.
३) प्राचार्य, सर्व शासकीय तसेच अनुदानित पदवी व पदविका संस्था.
४) कार्यासन क्र. ३, ४, मु.का., मुंबई
५) निवडनस्ती